# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 10 February 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १० फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- विद्यार्थ्यांची क्षमता, अंगभूत कौशल्य आणि कामातला आनंद या गोष्टींना अधिक महत्त्व देण्याचं पंतप्रधानांचं परीक्षा पे चर्चा कार्यक्रमातून आवाहन
- जनगणनेला विलंब झाल्याने १४ कोटी लोक अन्न सुरक्षा कायद्याच्या लाभापासून वंचित राहिल्याचा सोनिया गांधी यांचा आरोप
- सांडपाणी पुनर्वापरासाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करणार–पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची घोषणा

आणि

- उद्यापासून बारावीची परीक्षा–छत्रपती संभाजीनगर विभागात एक लाख ८५ हजारावर विद्यार्थ्यांची नोंदणी

****

विद्यार्थ्यांची क्षमता, अंगभूत कौशल्य आणि कामातला आनंद या गोष्टींना परीक्षेतले गुण, स्पर्धा आणि इतरांशी तुलना यापेक्षा अधिक महत्त्व देण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आज नवी दिल्लीत परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात ते विद्यार्थ्यांशी बोलत होते. इतरांशी स्पर्धा करण्यापेक्षा स्वत:शीच स्पर्धा करावी, तसंच परीक्षेआधी तणाव येऊ न देता उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊन अभ्यास करण्याचा सल्ला पंतप्रधानांनी दिला. परीक्षेदरम्यानचा ताणतणाव आणि चिंतेवर मात कशी करावी याबद्दल ते म्हणाले –

***बॅटस्मन उस प्रेशर की परवाह नही करता, उसका पुरा ध्यान उस बॉल की ओर होता है। अगर आप भी इस प्रेशर को मन मे न लेते हुये अपना ध्यान आज मैने इतना पढना तय किया था, ये अगर कर लेते है। आप आराम से उस प्रेशर मे से भी अपने आप को निकाल सकते है।***

परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाचं स्वरुप आता बदललं असून तो, सात भागात सादर होणार आहे. आतापर्यंत बंद सभागृहात किंवा प्रेक्षागृहात होणारा हा कार्यक्रम आज नवी दिल्लीतल्या एका रोपवाटिकेत पार पडला. पंतप्रधानांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना तिळगूळ देऊन गोड बोलायचा संदेश दिला. दरम्यान, या कार्यक्रमानंतर पंतप्रधान आज फ्रान्सच्या दौऱ्यावर रवाना झाले. पॅरिसमधे आयोजित कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेचं सह अध्यक्षपद ते भूषवणार आहेत.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत शालेय विद्यार्थ्यांसोबत 'परीक्षा पे चर्चा' हा कार्यक्रम पाहिला. राज्याचे माहिती आणि तंत्रज्ञान तसंच मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आशिष शेलार यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एकप्रकारे जीवनाचा मंत्र मिळत असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले –

***परीक्षा पे चर्चा याच्या माध्यमातनं विद्यार्थ्यांशी संवाद साधत, त्यांच्या मनातली भीती, त्यांच्या मनातले प्रेशर, त्याच्यावरचे उपाय हे या चर्चेतनं ते त्यांना सांगतात. आणि एक प्रकारे जीवनाचा मंत्र हा विद्यार्थ्यांना या माध्यमातून मिळत असतो.***

छत्रपती संभाजीनगर इथं विविध शैक्षणिक संस्थांनी आपले विद्यार्थी तसंच शिक्षकांसाठी या कार्यक्रमाचं थेट प्रसारण दाखवण्याची व्यवस्था केली होती. सरस्वती भुवन प्रशालेतले विज्ञान शिक्षक मयूर साबळे आणि विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाबाबत आपलं मत या शब्दांत व्यक्त केलं.

**बाईट – मयूर साबळे, युवराज वायाळ, चैतन्य मोरे आणि वेदांत कुलकर्णी**

****

जनगणनेला विलंब झाल्यामुळे देशातले जवळपास १४ कोटी लोक अन्न सुरक्षा कायद्याच्या लाभापासून वंचित राहिल्याचा आरोप काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी केला आहे. राज्यसभेत शून्य प्रहरात त्या बोलत होत्या. सरकारने लवकरात लवकर जनगणना करावी अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे आज अर्थसंकल्पावर चर्चा झाली.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज प्रयागराज इथं महाकुंभमेळ्यात त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केलं. त्यांनी अक्षयावत आणि बडे हनुमान मंदिरालाही भेट देऊन, डिजिटल महाकुंभ केंद्रातून कुंभमेळ्याची पाहणी केली. दरम्यान, १३ जानेवारीपासून सुरू झालेल्या या कुंभमेळ्यात आतापर्यंत ४३ कोटींपेक्षा जास्त भाविकांनी त्रिवेणी संगमावर स्नान केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल आपल्याला मान्य नसल्याचं, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. मुलुंड इथे शिक्षक सेनेच्या राज्यस्तरीय अधिवेशनात आज ते बोलत होते. राज्य सरकारच्या विविध योजनांवर ठाकरे यांनी टीका केली.

****

सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी पर्यावरण विभाग सर्वसमावेशक आराखडा तयार करणार असल्याची घोषणा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केली आहे. आयआयटी पवई इथं ‘स्थानिक स्वराज्य संस्थांमधे सांडपाण्याचं व्यवस्थापन आणि शाश्वत उपाययोजना’ या विषयावरच्या परिषदेत त्या बोलत होत्या. नद्यांच्या काठालगत असलेल्या ग्रामपंचायती, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रात प्रदूषित पाण्याचा नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या मदतीने पुनर्वापर करण्यासाठी तांत्रिक कक्षाची स्थापना करण्यात येईल, असं पंकजा मुंडे यांनी सांगितलं.

****

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या वतीने उद्या ११ तारखेपासून बारावीची परीक्षा सुरू होत आहे. १८ मार्चपर्यंत ही परीक्षा चालेल. छत्रपती संभाजीनगर विभागातील ४६० परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा होणार आहे. यंदा छत्रपती संभाजीनगर विभागातून छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली जिल्ह्यात एक हजार ४०८ महाविद्यालयातील एक लाख ८५ हजार, ३३०

विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली आहे. परीक्षे दरम्यान कॉपी मुक्त अभियानाअंतर्गत विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. परीक्षेमध्ये गैरप्रकार टाळण्यासाठी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी परीक्षा केंद्रांच्या परिसरात परीक्षा कालावधीत जमावबंदी आदेश जारी केले आहेत. विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी ऑनलाईन समुपदेशन करण्याकरीता राज्यमंडळ स्तरावरुन समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

****

परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कोठडीतील मृत्यूच्या पार्श्वभूमीवर तिथे कोम्बिंग ऑपरेशन कोणी केलं, लाठीचार्ज करण्याचे आदेश कोणी दिले, पोलीस अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली, असे प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विचारले आहेत. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. राहुल सोलापूरकर यांच्या विधानाबाबतही आव्हाड यांनी टीका केली.

****

राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या निमित्ताने आजपासून राज्यातल्या नांदेडसह ५ जिल्ह्यांत हत्तीरोग दुरिकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहिम राबवण्यात येणार आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते या मोहिमेला प्रारंभ करण्यात आला, राज्यस्तरावर सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत या मोहिमेला सुरुवात झाली. या मोहिमेत हत्तीरोगग्रस्त नागरिकांनी सहभागी व्हावं, असं आवाहन आबिटकर यांनी केलं.

****

धाराशिव जिल्ह्यातील विविध विकास कामांसाठी मंजूर १४१ कोटी १४ लाख रुपयांपैकी १०५ कोटी १५ लाख रुपये विविध यंत्रणांना वितरित करण्यात आले आहेत. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत यापैकी ९८ कोटी ७७ लाख रुपये खर्च झाले आहेत. विकास कामांसाठी निधी खर्च करण्याची प्रक्रिया गतीमान करण्यात येत असून, निधी पूर्ण क्षमतेने वापरण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

सोयाबीन खरेदी पुन्हा सुरू करण्याच्या मागणीसाठी लातूर जिल्ह्यातील निलंगा इथं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, छावा संघटना, युवा सेना इत्यादी पक्षांच्या

काही कार्यकर्त्यांनी बीएसएनएलच्या टॉवरवर चढून घोषणाबाजी केली. सरकारने किमान नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचं सोयाबीन तरी हमी भावानं खरेदी करावं अन्यथा प्रति क्विंटल १ हजार रुपये अनुदान शेतकऱ्यांना द्यावं, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

****

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात वीजपुरवठा सुरळीत करावा या मागणीसाठी महावितरणच्या कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी आज आंदोलन केलं. वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्यानं शेतातील पिकांना पाणी देणं अवघड होत आहे. वीजपुरवठा सुरळीत झाला नाही तर आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही आंदोलक शेतकऱ्यांनी दिला.

****

परभणी जिल्ह्यातील गंगाखेड शहराला वीज पुरवठा करणाऱ्या महावितरणच्या कार्यालयाजवळच्या रोहित्राला आज आग लागली. नागरीकांची सतर्कता तसंच पोलीस, आणि अग्निशमन दलाच्या प्रयत्नांमुळे ही आग आटोक्यात आली.

****